RNI No. MAHBIL /2009/35827

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग दोन-संकीर्ण सूचना व जाहिराती

वर्ष ११, अंक ५१] गुरुवार ते बुधवार, डिसेंबर १८-२४, २०२५/अग्रहायण २७-पौष ३, शके १९४७ [पृष्ठे, १८ किंमत : रुपये १५.००

### प्राधिकृत प्रकाशन

संकीर्ण सूचना व जाहिराती

**Serial No. M-2522**

**FORM No. 91**

**Form of Advertisement**

**[*See* rule 199(*4*)]**

NUMECH EMBALLAGE LIMITED

(CIN: L25209MH1985PLC037533)

(**IN CREDITORS' VOLUNTARY WINDING UP**)

**Notice of Contributories Meeting**

Notice is hereby given that a meeting of Contributories/ Shareholders in the above matter will be held at Unit No. 2, 7th Floor, B Wing, Times Square, Andheri-Kurla Road, Marol, Andheri East, Mumbai, Maharashtra 400 059 on Wednesday, 24th of December 2025 at 11.30 a.m.

Agenda: To lay account of the acts and dealings and of the conduct of the winding up during the preceding year *i.e.* 30th September 2024 to 29th September 2025, together with a statement in the prescribed Form No. 153 containing the prescribed particulars with respect to the proceedings and position of, the liquidation as per provisions of section 508 of the Companies Act, 1956.

Proxy forms are enclosed herewith.

Proxies to be used at the meeting must be lodged with the Liquidator not later than 11.30 a.m. on Sunday, 21st December 2025 at the registered office of the Company at 98, Princess Street (Shamaldas Gandhi Marg), 1st Floor, Office No. 15, Mansoor Building, Mumbai 400 002.

Dated this 3rd day of December 2025.

ASHWIN DOSHI,
Liquidator.



Part II sankirna (weekly) (-December 18-24 2025 ).indd 1 Dec 19, 2025 1:28:19 PM

**Serial No. M-2523**

**FORM No. 91**
**Form of Advertisement**

**[*See* rule 199(*4*)]**

NUMECH EMBALLAGE LIMITED
(CIN: L25209MH1985PLC037533)

**(IN CREDITORS' VOLUNTARY WINDING UP)**

**Notice of Creditors' Meeting**

Notice is hereby given that a meeting of Creditors in the above matter will be held at Unit No. 2, 7th Floor, B Wing, Times Square, Andheri-Kurla Road, Marol, Andheri East, Mumbai, Maharashtra 400 059 on Wednesday, 24th of December 2025 at 12.00 Noon.

Agenda : To lay account of the acts and dealings and of the conduct of the winding up during the preceding year *i.e. 30th September 2024 to 29th September 2025*, together with a statement in the prescribed Form No. 153 containing the prescribed particulars with respect to the proceedings and position of, the liquidation as per provisions of Section 508 of the Companies Act, 1956.

Proxy forms are enclosed herewith.

Proxies to be used at the meeting must be lodged with the Liquidator not later than 12.00 Noon on Sunday, 21st December 2025 at the registered office of the Company at 98, Princess Street (Shamaldas Gandhi Marg), 1st Floor, Office No. 15, Mansoor Building, Mumbai 400 002.

Dated this 3rd day of December 2025.

ASHWIN DOSHI,
Liquidator.

## बृहन्मुंबई महानगरपालिका

### अधिसूचना

क्रमांक प्र. अ. /(वि.नि)/२४१६३/पु. उप.—ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे "उक्त अधिनियम" असा उल्लेख करणेत आलेला आहे) चे कलम ३१, पोट-कलम (१) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून राज्य शासनाने अधिसूचना क्र. टिपीबी ४३१७/६२९/प्र.क्र.११८/२०१७/वि.यो./नवि-११, दि. ८/०५/२०१८ (यापुढे "उक्त अधिसूचना" असा उल्लेख करणेत आलेला आहे) द्वारे बृहन्मुंबई प्रारुप विकास योजना-२०३४ (यापुढे "उक्त विकास योजना" असा उल्लेख करणेत आलेला आहे) सह विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ ला मंजुरी दिली आहे ;

ज्याअर्थी, मंजूर विकास आराखडा-२०३४ नुसार, 'एस' विभागातील मौजे कांजूर(पूर्व) मधील न.भू.क्र ६५७ (भाग) हा भूखंड परवडणारी घरे(RR2.2), उद्यान/बगिचा(ROS1.5) या आरक्षणांनी बाधित आहे तसेच, ९.१५ मी, १८.३० मी(४ नं.) व २७.४५ मी. विकास नियोजित रस्त्याने व अस्तित्वातील रस्त्याने बाधित आहे ;

ज्याअर्थी, मे. जॉली ब्रदर्स प्रा. लि. यांनी त्यांच्या दि. २९.०७.२०२० रोजीच्या पत्रान्वये एस विभागातील मौजे कांजुर(पूर्व) मधील न.भू.क्र ६५७ (भाग) ह्या भूखंडावरील प्रस्तावित १८.३० मी. तिरपा विकास नियोजन रस्ता वगळण्याची विनंती नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासनास केली ;

ज्याअर्थी, अवर सचिव, नगरविकास विभाग यांनी त्यांच्या दिनांक ०९.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमातील कलम ३७(१) अन्वये फेरबदलाची कार्यवाही अनुसरुन फेरबदलाचा प्रस्ताव शासनास सादर करण्यास कळविले ;

ज्याअर्थी, 'एस' विभागाचा मंजूर विकास आराखडा, २०३४ मध्ये, 'एस' विभागातील मौजे कांजूर(पूर्व) मधील अंदाजित ८३८३.८ चौ.मी. इतक्या क्षेत्रफळाचा न.भू.क्र ६५७ (भाग) धारण करणाऱ्या भूखंडावरील प्रस्तावित १८.३० मी. रुंद तिरपा विकास नियोजन रस्ता वगळून सदर भूखंड लगतच्या 'परवडणारी घरे (RR2.2)' या आरक्षणामध्ये समाविष्ट करण्याचे प्रस्तावित आहे ;

ज्याअर्थी, महानगरपालिकेचे परिपत्रक क्र. बीएमसी/ एडीएमएन/ ३, दि. ०७.०४.२०२२ नुसार अद्यावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ६क(१) अन्वये महानगरपालिका आणि महानगरपालिकेच्या इतर प्राधिकरणांचे सर्व अधिकार आता प्रशासकांकडे निहित आहेत ;

ज्याअर्थी, प्रशासक (सुधार समिती) यांनी ठराव क्र.८३, दि ०९.१२.२०२५ अन्वये व प्रशासक (महानगरपालिका) यांची ठराव क्र. ९२७ दि. १०.१२.२०२५ अन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ कलम ३७(१) मधील तरतुदीनुसार मंजूर विकास आराखडा, २०३४ मध्ये फेरबदल करण्याच्या प्रस्तावाची कार्यवाही सुरु करणे, विहीत कालावधीमध्ये सूचना / हरकती मागविणे व प्राप्त सूचना / हरकतींवर सुनावणी घेणे आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७(२) नुसार फेरबदल प्रस्तावास महाराष्ट्र शासनाची अंतिम मंजुरी घेणेकरिता नगरविकास विभाग खात्याशी पत्रव्यवहार करण्याची मंजुरी दिली आहे ;

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ च्या पोट-कलम (१) आणि (२ ) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून नियोजन प्राधिकरण, किंवा राज्य सरकारने असे निर्देश दिल्यावर, अशा निर्देशांच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत, कोणत्याही व्यक्तीकडून सूचना/आक्षेप मागवण्याकरिता नोटीस प्रकाशित केली जाईल आणि सुनावणी दिल्यानंतर, प्रस्तावित बदल राज्य सरकारला सादर करण्यात येईल. सदर बदल मंजूर करणे किंवा मंजुरी देण्यास नकार देणे हे राज्य सरकारच्या अधीन राहील.

आणि त्याअर्थी, उपरोक्त परिस्थिती आणि वस्तुस्थिती विचारात घेता आणि उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१) अन्वये प्राप्त अधिकार आणि त्या संदर्भातील सर्व अधिकारांचा वापर करुन, बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे प्रस्तावित फेरबदलाविषयी उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१) नुसार कोणत्याही व्यक्तीकडून हरकती / सूचना मागविण्यासाठी तसेच संभाव्य बाधित होणाऱ्या व्यक्तींच्या माहितीसाठी सदर सूचना प्रसिद्ध करीत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून असेही कळविण्यात येत आहे की, वरील प्रस्तावित फेरबदलाविषयी कोणत्याही हरकती/सूचना, सदर सूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत लेखी स्वरुपात प्रमुख अभियंता (विकास नियोजन), बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे महानगरपालिका मुख्यालय, ५ वा मजला, विस्तारित इमारत, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठविण्यात याव्यात. सदरच्या कालावधीत प्राप्त होणाऱ्या हरकती/सूचना यावर उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करण्यात येईल. त्यानंतर प्राप्त झालेल्या सूचना / हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.



Part II sankirna (weekly) (-December 18-24 2025 ).indd 3 Dec 19, 2025 1:28:19 PM

प्रस्तावित फेरबदल दर्शविणारा नकाशा जनतेच्या अवलोकनासाठी खालील कार्यालयात उपलब्ध करण्यात आला आहे. :—

(१) प्रमुख अभियंता (विकास नियोजन), बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे कार्यालय, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.

(२) सहायक आयुक्त, एन विभाग, २ रा मजला, जवाहर रोड, घाटकोपर (पूर्व), मुंबई ४०० ०७७.

(३) उपसंचालक, नगररचना, बृहन्मुंबई यांचे कार्यालय, इन्साहटमेंट, ई-ब्लॉक, आझाद मैदान, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.

**सुनिल हि. राठोड,**
प्रमुख अभियंता (विकास नियोजन).

मुंबई,
दिनांक ११ डिसेंबर २०२५.
PRO/2616/ADV/2025-26.

## BRIHANMUMBAI MUNICIPAL CORPORATION

*NOTIFICATION*

क्रमांक प्र. अ./(वि.नि)/२४१६३/पु. उप.—Whereas, as per the powers conferred by sub-section (*1*) of section 31 of the MR and TP Act, 1966, State Government has accorded sanction to the Draft Development Plan-2034 of Greater Mumbai (hereinafter referred to as "the said Development Plan") *vide* Notification No. TPB-4317/629/CR-118/2017/DP/UD-11, Dt. 08.05.2018 (hereinafter referred to as "the said Notification") along with the Development Control and Promotion Regulations-2034 for Greater Mumbai ;

And whereas, as per the DP-2034, of 'S' Ward the land bearing C.T.S. No. 657(pt) of village Kanjur(E) is affected by the reservation of RR2.2(Affordable Housing) & ROS1.5(Garden/Park). Further, it is affected by 9.15 mt., 18.30 mt(4 nos.) & 27.45 mt wide proposed DP Road and Existing roads ;

And whereas, M/s. Jolly Brothers Pvt. Ltd. *vide* their letter dated 29.07.2020, requested the Urban Development Department, Government of Maharashtra, to delete the proposed 18.30 mt wide diagonal DP road affecting the land bearing C.T.S. No. 657(pt) of village Kanjur (E), in 'S' Ward ;

And whereas, Under Secretary, Urban Development Dept.(UDD), GoM, *vide* their letter dated 09.07.2024, informed that the modification proposal should be submitted to the Goverment by following the procedure for modification under section 37(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act ;

And whereas, in the sanctioned Development Plan-2034 of 'S' Ward, it is proposed to delete the 18.30 mt wide diagonal DP road affecting the land bearing C.T.S. No. 657(pt) of village Kanjur(E) having area adm. approx. 8383.8 sq.mt and to include the said land in the adjoining reservation of 'Affordable Housing (RR2.2)' ;

And whereas, Administrator (Improvement Committee) *vide* Resolution No. 83 of 09.12.2025 and Administrator (Corporation) *vide* Resolution No. 927 dtd. 10.12.2025 has accorded sanction to initiate the modification proposal u/s. 37(1) of MRTP Act, 1966 , to invite suggestions/ objections from general public to conduct hearing on said suggestions /objections and to make correspondence with State Govt. in Urban Development Dept for final sanction u/s. 37(2) of MRTP Act, 1966 for the proposed modification in Sanctioned DP 2034 ;

And whereas, as per circular u/no. BMC/ADMN/3, dt. 07.04.2022, under section 6C (1) of Mumbai Municipal Corporation Act, 1888 (hereinafter referred as 'MMC Act,1888') all the powers of the Corporation are now vested with the Administrator ;

And whereas, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) and (*2*) of Section 37 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "MR & TP Act, 1966"), the Planning Authority may, or when so directed by the State Government shall within one month from date of such directions publish a notice inviting suggestions/ objections from any person, as mentioned therein and after giving hearing, submit the proposed modification to the State Government and the State Government subject to such condition as it may deem fit sanction the modification or refuse to accord sanction.

Now, therefore, after considering the above facts and circumstances and in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of Section 37 of the MR & TP Act, 1966; and of all other powers enabling it in this behalf, Brihanmumbai Municipal Corporation (hereinafter referred as BMC) hereby publishes a Notice for inviting objections/ suggestions from any persons with respect to proposed modification, as required by Section 37(1) of the said Act, for information of all persons likely to be affected thereby. BMC is further pleased to inform that any objections/ suggestions in respect of the proposed modification mentioned above may be forwarded, in writing before the expiry of 30 days from the date of publication of this notification, to the office of

Chief Engineer (Development Plan)
Brihanmumbai Municipal Corporation,
5th Floor, Municipal Head Office,
Mahapalika Marg, Fort, Mumbai 400 001.

Any objections or suggestions, which may be received within the said period will be dealt with in accordance with the provisions of Section 37(1) of the said Act by the Chief Engineer (Development Plan) BMC. The Suggestions/Objections received after expiry period of one month will not be considered

A part plan showing the proposed modification is kept open for the inspection of the general public at the following offices :—

(1) Office of the Chief Engineer (Development Plan), 5th Floor, Brihanmumbai Municipal Corporation, Mahapalika Marg, Mumbai 400 001.

(2) Office of A.C., N. Ward, 2nd Floor, Javahar Road, Ghatkopar (E), Mumbai 400 077.

(3) Office of the Deputy Director of Town Planning, Greater Mumbai, having his office at ENSA Hutments, E-Block, Azad Maidan, Mahapalika Marg, Mumbai 400 001.

Mumbai,
dated the 11th December 2025,
PRO/2616/ADV/2025-26.

S. H. RATHOD,
Chief Engineer,
(Development Plan).

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नागपूर विभाग, नागपूर**

**चौकशीची जाहीर नोटीस**

मा. कोर्ट विद्यमान सहायक धर्मादाय आयुक्त-२, नागपूर यांचे न्यायालय

क्रमांक - न्यायशाखा/१०६९९/२०२५

अर्ज क्रमांकः - ४९/२०२१
कलम ५०अ (२) (ए)

सर गंगाधरराव चिटणवीस मेमोरियल रिसर्च ट्रस्ट, नागपूर, ता. जि. नागपूर नोंदणी क्रमांक ई- ८३१ व नागपूर इमरजन्सी मेडिकल सर्व्हिस सोसायटी, सिव्हील लाईन्स, नागपूर नोंदणी क्रमांक एफ-२११२४ चे बाबत मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ५०अ (२) (ए) नुसारचा अर्ज.

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेला सूचित करण्यात येते की, **सर गंगाधरराव चिटणवीस मेमोरियल रिसर्च ट्रस्ट, नागपूर, ता. जि. नागपूर नोंदणी क्रमांक ई- ८३१ व नागपूर इमरजन्सी मेडिकल सर्व्हिस सोसायटी, सिव्हील लाईन्स, नागपूर नोंदणी क्रमांक एफ-२११२४** या न्यासासाठी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम ५०अ (२) (ए) अन्वये **सर गंगाधरराव चिटणवीस मेमोरियल रिसर्च ट्रस्ट, नागपूर, ता. जि. नागपूर नोंदणी क्रमांक ई-८३१ या न्यासामध्ये नागपूर इमरजन्सी मेडिकल सर्व्हिस सोसायटी, सिव्हील लाईन्स, नागपूर नोंदणी क्रमांक एफ-२११२४** हे न्यास विलीन करण्याकरिता मंजुरीसाठी अर्जदार श्री. मिलींद चिटणवीस व १ यांनी अर्ज दाखल केला आहे.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफीयत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून ३० दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रीतीने पाठविणे, नंतर आलेल्या कैफीयतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफीयत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त, नागपूर यांचे शिक्यानिशी आज दिनांक २४ नोव्हेंबर २०२५ रोजी दिली.

(सही/-)
अधीक्षक (न्याय शाखा),
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नागपूर विभाग, नागपूर.

## बृहन्मुंबई महानगरपालिका

### सूचना

क्रमांक प्र.अ./वि.नि./२४३५७/शहर.—ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ च्या पोट-कलम (१) आणि (२) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून नियोजन प्राधिकरण, किंवा राज्य सरकारने असे निर्देश दिल्यावर, अशा निर्देशांच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत, कोणत्याही व्यक्तीकडून सूचना/आक्षेप मागवण्याकरिता नोटीस प्रकाशित केली जाईल आणि सुनावणी दिल्यानंतर, प्रस्तावित बदल राज्य सरकारला सादर करण्यात येईल, सदर बदल मंजूर करणे किंवा मंजुरी देण्यास नकार देणे हे राज्य सरकारच्या अधिकारास अधीन राहील.

ज्याअर्थी, महानगरपालिकेचे परिपत्रक क्र. बीएमसी /एडीएमएन /३, दि. ०७.०४.२०२२ नुसार अद्यावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ६क (१) अन्वये महानगरपालिका आणि महानगरपालिकेच्या इतर प्राधिकरणांचे सर्व अधिकार आता प्रशासकांकडे निहित आहेत.

त्याअर्थी, प्रशासक (महानगरपालिका) यांचा ठराव क्र. ९८८, दि. १२.१२.२०२५ च्या आदेशान्वये ‘डी’ विभागातील मलबार हिल येथील न.भू.क्र. १बी/६६९ या एकूण २४७५.०७चौ.मी. क्षेत्रफळ असलेल्या भूखंडावरील बृहन्मुंबई विकास आराखडा-२०३४ मध्ये ‘विद्युत प्रेषण व वितरण सुविधा + बेस्ट बस सुविधा (EPU५.२+ET१.४)’ ह्या नामनिर्देशनाने दर्शविण्यात आलेली विद्यमान सुविधा रद्द करण्याबाबत आणि सदर भूखंड ‘रहिवास/ निवासी वापर क्षेत्रात’ समाविष्ट करण्याकरिता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ कलम ३७(१) नुसार मंजुर विकास आराखडा, २०३४ मध्ये फेरबदल करण्याच्या प्रस्तावाची कार्यवाही सुरु करण्याबाबत आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ (२) नुसार फेरबदल प्रस्तावास महाराष्ट्र शासनाची अंतिम मंजुरी घेण्याकरिता नगरविकास विभाग खात्याशी संपर्क साधण्याची मंजुरी दिली आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे “उक्त अधिनियम” असा उल्लेख करण्यात आलेला आहे) चे कलम ३१, पोट-कलम (१) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून राज्य शासनाने अधिसूचना क्र.टीपीबी ४३१७/६२९/ प्र.क्र.११८/२०१७/वि.यो./नवि-११, दि. ८/०५/२०१८ (यापुढे “उक्त अधिसूचना” असा उल्लेख करणेत आलेला आहे) द्वारे बृहन्मुंबई प्रारुप विकास आराखडा-२०३४ (यापुढे “उक्त विकास आराखडा” असा उल्लेख करणेत आलेला आहे) सह विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ ला उक्त अधिसूचनेसोबतचे परिशिष्ट-ब मध्ये दर्शविलेले सारभूत स्वरुपाचे फेरबदल (ई.पी.) वगळून उक्त अधिसूचनेसोबतचे परिशिष्ट-अ मध्ये दर्शविलेल्या सुधारणेसह मंजुरी दिली आहे.

आणि ज्याअर्थी, त्यानंतर शासनाने उक्त अधिसूचनेस समक्रमांकाचे शुध्दीपत्रक व पुरकपत्र, दि. २९ जून, २०१८ रोजी पारित केले असून सदर शुध्दीपत्रक व पुरकपत्र **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात**, दि. ३० जून, २०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी, शासनाने उक्त अधिसूचनेस समक्रमांकाचे शुध्दीपत्रक, दि. २२ जून २०१८ रोजी निर्गमित केले असून त्यानुसार उक्त विकास योजना दि.१.९.२०१८ पासून अंमलात आली आहे.

आणि ज्याअर्थी, मलबार हिल येथील न.भू.क्र.१बी/६६९ ह्या भूखंडावरील मंजूर विकास आराखडा-२०३४ मध्ये दर्शविण्यात आलेली ‘विद्युत प्रेषण व वितरण सुविधा + बेस्ट बस सुविधा (EPU५.२+ET१.४)’ ही विद्यमान सुविधा वगळून सदर भूखंड ‘रहिवासी/निवासी क्षेत्रात’ समाविष्ट करण्याबाबत महाव्यवस्थापक, बेस्ट उपक्रम यांनी क्र. DO/GM/CEC/15193/2025, दि.०५.१२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये विनंतीपूर्वक अर्ज महानगरपालिका आयुक्त यांना सादर केला आहे. सदर अर्जाद्वारे, बेस्ट उपक्रम यांनी उपक्रमाची कार्यक्षमता आणि सेवा वितरण वाढविण्यासाठी अतिरिक्त महसूल निर्माण करण्याच्या हेतूने न.भू.क्र. १बी/६६९, मलबार हिल या भूखंडावरील त्यांच्या विद्यमान कर्मचारी/अधिकाऱ्यांचे निवासस्थाने तृतीय पक्षांना निवासी वापरासाठी भाड्याने देण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू केली असल्याचे कळविले आहे. सदर भूखंड हा मंजूर विकास आराखडा-२०३४ नुसार ‘विद्युत प्रेषण व वितरण सुविधा + बेस्ट बस सुविधा (EPU५.२+ET१.४)’ या विद्यमान सुविधेने बाधित असून त्यावर आपत्कालीन/आवश्यक बेस्ट कर्मचारी निवासस्थानांच्या पूरक वापरास परवानगी आहे. सबब, सामान्य निवासी वापरासाठी तृतीय पक्षाला सदर निवासस्थाने भाड्याने देणेकामी महाव्यवस्थापक, बेस्ट उपक्रम यांनी दि.०५.१२.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे सदर जमिनीवरील ‘विद्युत प्रेषण व वितरण सुविधा + बेस्ट बस सुविधा (EPU५.२+ET१.४)’ ची विद्यमान सुविधा वगळणेबाबत विनंती केली आहे.

तसेच, ह्या विभागास नगरविकास खाते, महाराष्ट्र शासन यांच्या पत्र क्र. टीबीपी-४३२४/२१४३/प्र.क्र.१८५/२०२५/नवि-११, दि.०२.१२.२०२५ अन्वये मलबार हिल येथील न.भू.क्र.१बी/६६९ ह्या भूखंडावरील 'विद्युत प्रेषण व वितरण सुविधा + बेस्ट बस सुविधा (EPU५.२+ET१.४)' ही विद्यमान सुविधा रद्द करणेबाबत बेस्ट उपक्रम यांनी केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने विकास आरखड्यात सुधारणा/ फेरबदल करण्यासाठी महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदलाची वैधानिक कार्यवाही करून फेरबदलाचा प्रस्ताव शासनास सादर केल्यास त्यावर शासन स्तरावर गुणवत्तेनुसार निर्णय घेता येईल, असे कळविण्यात आले आहे. मिळकतीच्या मालमत्ता पत्रकानुसार सदर भूखंडांचे मालकीहक्क 'बेस्ट उपक्रम' यांच्या नावे आहे व क्षेत्रफळ २४७५.०७चौ.मी. इतके आहे. मंजूर विकास आराखडा-२०३४ नुसार सदर भूभाग 'विद्युत प्रेषण व वितरण सुविधा + बेस्ट बस सुविधा (EPU५.२+ET१.४)' या विद्यमान सुविधेने बाधित असून रहिवासी/निवासी क्षेत्र (R-zone) मध्ये आहे.

आणि ज्याअर्थी, नगरविकास खाते, महाराष्ट्र शासन यांच्या, दि. ०२.१२.२०२५ रोजीच्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे, 'डी' विभागातील मलबार हिल येथील न.भू.क्र.१बी/६६९ या एकूण २४७५.०७चौ.मी. क्षेत्रफळ असलेल्या संपूर्ण भूखंडावरील बृहन्मुंबई विकास आराखडा-२०३४ मध्ये 'विद्युत प्रेषण व वितरण सुविधा + बेस्ट बस सुविधा (EPU५.२+ET१.४)' ह्या नामनिर्देशनाने दर्शविण्यात आलेली विद्यमान सुविधा रद्द करणे व सदर भूखंड 'रहिवास/ निवासी वापर क्षेत्रात' (R Zone) समाविष्ट करणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, नगरविकास खाते, महाराष्ट्र शासन यांच्या, दि. ०२.१२.२०२५ रोजीच्या निर्देशानुसार व महाव्यवस्थापक, बेस्ट उपक्रम यांच्या दि.०५.१२.२०२५ रोजीच्या विनंतीपूर्वक अर्जान्वये डी' विभागातील मलबार हिल येथील न.भू.क्र.१बी/६६९ या एकूण २४७५.०७चौ.मी. क्षेत्रफळ असलेल्या संपूर्ण भूखंडावरील बृहन्मुंबई विकास आराखडा-२०३४ मध्ये 'विद्युत प्रेषण व वितरण सुविधा + बेस्ट बस सुविधा (EPU५.२+ET१.४)' ह्या नामनिर्देशनाने दर्शविण्यात आलेली विद्यमान सुविधा रद्द करून सदर भूखंड 'रहिवास/ निवासी वापर क्षेत्रात' (R Zone) समाविष्ट करणेकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७(१) अन्वये, 'डी' विभागाच्या मंजूर विकास आराखडा-२०३४ मध्ये फेरबदल करण्याकरिता महाव्यवस्थापक, बेस्ट उपक्रम यांनी दि.०५.१२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये विनंतीपूर्वक अर्ज महानगरपालिका आयुक्त यांना सादर केला आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेने महानगरपालिका ठराव क्र. ९८८ दिनांक १२.१२.२०२५ व सुधार समिति ठराव क्र. १०३ दिनांक १२.१२.२०२५ अन्वये सदर भूखंडावर उक्त फेरबदलाबाबत प्रक्रिया सुरू करण्यासाठी मंजुरी दिली आहे.

त्यामुळे आता, वरील बाबी लक्षात घेऊन आणि प्रमुख अभियंता (विकास नियोजन) यांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अंतर्गत महानगरपालिकेने विहित केलेल्या अधिकारानुसार प्रस्तावित फेरबदलाविषयी सूचना / हरकती मागवण्याचा अधिकार देण्यात आला आहे.

आणि त्याअर्थी, उपरोक्त परिस्थिती आणि वस्तुस्थिती विचारात घेता आणि उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१) अन्वये प्राप्त अधिकार आणि त्या संदर्भातील सर्व शक्तींचा वापर करून, बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे प्रस्तावित फेरबदलाविषयी उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१) नुसार कोणत्याही व्यक्तीकडून हरकती / सूचना मागविण्यासाठी तसेच संभाव्य बाधित होणाऱ्या व्यक्तींच्या माहितीसाठी सदर सूचना प्रसिध्द करीत आहे. मनपाकडून असेही कळविण्यात येत आहे की, खालील परिशिष्टात नमूद प्रस्तावित फेरबदलाविषयी कोणत्याही हरकती/सूचना, सदर सूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत लेखी स्वरुपात प्रमुख अभियंता (विकास नियोजन), बृहन्मुंबई महानगरपालिका या कार्यालयाच्या खालील पत्त्यावर पाठविण्यात याव्यात.

महानगरपालिका मुख्यालय,
५ वा मजला, विस्तारित इमारत,
महापालिका मार्ग, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१

सदरच्या कालावधीत प्राप्त होणाऱ्या हरकती/सूचना यावर उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करण्यात येईल. प्रस्तावित फेरबदल दर्शविणारा नकाशा जनतेच्या अवलोकनासाठी खालील ठिकाणी ठेवण्यात आला आहे :

१. प्रमुख अभियंता (विकास नियोजन), बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे कार्यालय, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.

२. सहायक आयुक्त, डी विभाग, महानगरपालिका इमारत, जोबनपुत्रा कंपाऊंड, नाना चौक, ग्रँट रोड(प.) मुंबई ४०० ००७.

३. उपसंचालक, नगररचना, बृहन्मुंबई यांचे कार्यालय, इन्साहटमेंट, ई-ब्लॉक, आझाद मैदान, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.



Part II sankirna (weekly) (-December 18-24 2025 ).indd 9 Dec 19, 2025 1:28:21 PM

## परिशिष्ट
## SCHEDULE

| Details of land | Reservation / Existing Amenity/Zone as per Sanctioned DP-2034 | Proposed Modification |
|---|---|---|
| CS No. 1B/669 of Malabar Hill Div. in D Ward | 2475.07 Sqm. shown as an Existing Amenity of EPU5.2 (Electricity transmission & distribution facilities) + ET1.4 (Best bus facilities) | To delete the Existing Amenity of EPU5.2 (Electricity transmission & distribution facilities) + ET1.4 (Best bus facilities) and include in adjoining predominant zone of Residential zone (R zone). |

दिनांक १३ डिसेंबर २०२५,
PRO/2656/ADV/2025-26.

**सु. हि. राठोड,**
प्रमुख अभियंता,
(विकास नियोजन).

## BRIHANMUMBAI MUNICIPAL CORPORATION

### Notice

No. Ch.E/DP/24357/City.—Whereas, in exercise of the powers conferred by sub section (*1*) and (*2*) of Section 37 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "MR & TP Act, 1966"), the Planning Authority may, or when so directed by the State Government shall within one month from date of such directions publish a notice inviting suggestions/ objections from any person, as mentioned therein and after giving hearing, submit the proposed modification to the State Government and the State Government subject to such condition as it may deem fit sanction the modification or refuse to accord sanction ;

And whereas, as per circular u/No. BMC/ADMN/3, dt. 07.04.2022, under section 6C (1) of Mumbai Municipal Corporation Act, 1888 (hereinafter referred as 'MMC Act. 1888') all the powers of the Corporation are now vested with the Administrator;

And whereas, Administrator (Corporation) has accorded sanction to the proposal *vide* resolution No. 988 dtd.12.12.2025, to take further action regarding deletion of Existing Amenity of EPU5.2(Electricity transmission & distribution facilities) + ET1.4(Best bus facilities) shown on entire plot bearing CS No.1B/669 of Malabar Hill div. in D Ward admeasuring 2475.07sqm (herein referred as 'the said plot'), and to include said CS No.1B/669 of Malabar Hill div. in adjoining predominant zone of Residential zone (R zone), so as to modify the Sanctioned DP 2034 and to invite suggestions/ objections from general public u/sec 37(*1*) of MRTP Act, 1966 and to approach State Govt. in Urban Development Dept for final sanction u/sec 37(2) of MRTP Act, 1966 for modification in Sanctioned DP 2034 ;

And whereas, as per the powers conferred by sub-section (*1*) of Section 31 of the MR & TP Act, 1966, State Government has accorded sanction to the Draft Development Plan- 2034 of Greater Mumbai (hereinafter referred to as "the said Development Plan") *vide* Notification No. TPB-4317/629/ CR-118/2017/DP/UD-11, Dt. 08.05.2018 (hereinafter referred to as "the said Notification") along with the Development Control and Promotion Regulations-2034 for Greater Mumbai with modifications shown in SCHEDULE-A appended to the said Notification excluding the substantial modifications as shown in SCHEDULE-B appended to the said Notification ;

And whereas, thereafter Government has issued a Corrigendum and Addendum dtd. 29th June 2018 to the said Notification, which is published in the Government Gazette dated 30th June, 2018 ;

And whereas, Government has issued a corrigendum dated 22nd June 2018 to the said Notification, as per which, the said Development Plan has come into force from 01.09.2018 ;

And whereas, a letter u/No. DO/GM/CEC/15193/2025, dated 05.12.2025 is received from General Manager, BEST Undertaking addressed to the Municipal Commissioner, wherein it is mentioned that, the BEST Undertaking has initiated tender process to lease its existing staff/officer's quarters to third parties for residential use in order to generate additional revenue to augment non-fare box revenue which will be instrumental in enhancing the Undertaking's operational efficiency and service delivery. Plot bearing CS No.1B/669 of Malabar Hill is categorized under existing amenity EPU5.2+ET1.4 (Electricity transmission & distribution facilities+ Best bus facilities) which allows for ancillary use of emergency/essential BEST staff quarters. Leasing these flats to third party for general residential use would therefore require a change in land use classification in DP-2034 ;

And whereas, also as per letter dtd 02.12.2025 from UDD, GoM, wherein, it is directed to initiate the process of 37(1) of MR & TP Act, 1966 for deletion of existing amenity EPU5.2+ET1.4 (Electricity transmission & distribution facilities+ Best bus facilities) on the said plot in DP-2034. As per online PRC ownership details of said plot bearing CS No.1B/669 Malabar Hill vests with ' The BEST Undertaking ' and plot area as per PRC is 2475.07 sqm. As per DP 2034, entire area of said plot is seen to be affected by existing amenity of EPU5.2 (Electricity transmission & distribution facilities) + ET1.4(Best bus facilities) ;

And whereas, as per the request of BEST Undertaking and the directions from Govt. in UDD, it is proposed to delete the Existing Amenity of EPU5.2 (Electricity transmission & distribution facilities) + ET1.4(Best bus facilities) shown on entire plot bearing CS No.1B/669 of Malabar Hill div. in D Ward admeasuring 2475.07sqm and to include said plot in adjoining predominant zone of Residential zone (R zone) u/sec.37(1) of MR & TP Act, 1966, Municipal Corporation of Greater Mumbai has accorded sanction *vide* Improvement Committee Resolution No. 103, dtd 12.12.2025 and Corporation Resolution No. 988 dtd 12.12.2025 for initiating the process of aforesaid modification as per su-bsection (*1*) of Section 37 MR & TP Act, 1966.

Now, therefore, after considering the above facts and whereas Chief Engineer (Development Plan) is empowered to invite suggestions/objections u/s. 37(*1*) of MRTP Act, 1966 for proposed modification in Sanctioned DP 2034.

Now, therefore, after considering the above facts and circumstances and in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of Section 37 of the said Act; and of all other powers enabling it in this behalf, MCGM hereby publishes a Notice for inviting objections / suggestions from any persons with respect to proposed modification, as required by Section 37(*1*) of the said Act, for information of all persons likely to be affected thereby. MCGM is further pleased to inform that any objections/ suggestions in respect of the proposed modification mentioned in the Schedule given below may be forwarded, in writing before the expiry of one month from the date of publication of this notification, to the office of

Chief Engineer (Development Plan)
Municipal Corporation of Greater Mumbai,
5th Floor, Municipal Head Office,
Mahapalika Marg, Fort, Mumbai 400 001.

Any objections or suggestions, which may be received within the said period will be dealt with in accordance with the provisions of Section 37(*1*) of the MRTP Act by the Chief Engineer (Development Plan) Municipal Corporation of Greater Mumbai.

A part plan showing the proposed modification is kept open for the inspection of the general public at the following offices :-

(1) Office of the Chief Engineer (Development Plan), 5th Floor, Municipal Corporation of Greater Mumbai, Mahapalika Marg, Mumbai 400 001.

(2) Office of Assistant Commissioner D Ward, Municipal Office Building, Jobanputra Compound, Nana Chowk, Grant Road (W.), Mumbai 400 007.

(3) Office of the Deputy Director of Town Planning, Greater Mumbai, having his office at ANSA Hutments, E-Block, Azad Maidan, Mahapalika Marg, Mumbai 400 001.

**SCHEDULE**

| **Details of land** | **Reservation / Existing Amenity/Zone as per Sanctioned DP-2034** | **Proposed Modification** |
|---|---|---|
| CS No. 1B/669 of Malabar Hill div. in D Ward | 2475.07 Sqm. shown as an Existing Amenity of EPU5.2 (Electricity transmission & distribution facilities) + ET1.4 (Best bus facilities) | To delete the Existing Amenity of EPU5.2 (Electricity transmission & distribution facilities) + ET1.4 (Best bus facilities) and include in adjoining predominant zone of Residential zone (R zone). |

Dated 13th December 2025,
PRO/2656/ADV/2025-26.

S. H. RATHOD,
Chief Engineer,
(Development Plan).

## बृहन्मुंबई महानगरपालिका

### सूचना

क्रमांक प्र.अ./ वि.नि./२३०४८/प.उप.—ज्याअर्थी , महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करणेत आलेला आहे.) च्या तरतुदींनुसार बृहन्मुंबई महानगरपालिका त्यांचे अधिकार क्षेत्राकरिता (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त महानगरपालिका" असा करणेत आलेला आहे.) नियोजन प्राधिकरण आहे ;

ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३१ पोट-कलम (१) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून राज्य शासनाने अधिसूचना क्र. टिपीबी-४३१७/६२९/प्र.क्र.११८/२०१७/वियो/नवि-११, दि.८/०५/२०१८ (यापुढे याचा उल्लेख "उक्त अधिसूचना" असा करणेत आलेला आहे) द्वारे बृहन्मुंबई प्रारूप विकास योजना २०३४ (यापुढे याचा 'उल्लेख उक्त विकास योजना' असा करणेत आलेला आहे) सह विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ ला (यापुढे याचा उल्लेख 'उक्त नियमावली' असा करणेत आलेला आहे) उक्त अधिसूचनसोबतचे परिशिष्ट-ब मध्ये दर्शविलेले सारभूत स्वरुपाचे फेरबदल (ई.पी.) वगळून उक्त अधिसूचनेत परिशिष्ट-अ मध्ये दर्शविलेल्या सुधारणेसह मंजुरी दिली आहे; आणि ज्याअर्थी शासनाने उक्त अधिसूचनेस सम क्रमांकाचे शुद्धीपत्रक, दि.२२ जून २०१८ रोजी निर्गमित केले आहे; आणि ज्याअर्थी, त्यानंतर उक्त अधिसूचनेस शासनाने समक्रमांकाचे शुद्धिपत्रक व पुरकपत्र दि. २९ जून, २०१८ रोजी पारित केले असून सदर शुद्धीपत्रक व पूरकपत्र **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** दि. ३० जून, २०१८ रोजी प्रसिद्ध करण्यात आले आहे; आणि ज्याअर्थी, उक्त नियमावली दि. १/०९/२०१८ पासून अंमलात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ च्या पोट-कलम (१) आणि (२) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून नियोजन प्राधिकरण, किंवा राज्य सरकारने असे निर्देश दिल्यावर, अशा निर्देशांच्या तारखेपासून नव्वद दिवसांच्या आत, कोणत्याही व्यक्तीकडून आक्षेप आणि सूचना मागवण्याकरिता नोटीस प्रकाशित केली जाईल आणि सुनावणी दिल्यानंतर, प्रस्तावित बदल राज्य सरकारला सादर करण्यात येईल. सदर फेरबदल मंजूर करणे किंवा मंजुरी देण्यास नकार देणे हे राज्य सरकारच्या अधीन राहील ;

आणि ज्याअर्थी, महानगरपालिकेचे परिपत्रक क्र. बीएमसी/ एडीएमएन/३, दि. ०७.०४.२०२२ नुसार अद्यावत सुधारित मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम ६क(१) अन्वये महानगरपालिका आणि महानगरपालिकेच्या इतर प्राधिकरणांचे सर्व अधिकार आता प्रशासकांकडे निहित आहेत ;

आणि ज्याअर्थी,ह्या विभागाच्या दि.२२.०७.२०२१ व दि. १९.०१.२०२४ रोजी अवर सचिव,महाराष्ट्र शासन यांना सदर केलेल्या अहवालावर, अवर सचिव,महाराष्ट्र शासन यांनी त्यांच्या दि.१६.०९.२०२४ रोजीच्या पत्राद्वारे खालील निर्देश दिले होते.

" सदर भूखंड विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ चे विनियम १७ (१) मधील तरतुदीनुसार समावेशक आरक्षणाचे माध्यमातून विकसित करावयाचा झाल्यास त्यानुसार,महापालिकेस हस्तांतरीत करावयाचे भूखंडाचे क्षेत्र वगळता जमिन मालक यांना विकासासाठी राहणारे क्षेत्र कमी भरत असल्याची बाब विचारात घेता, आपणांस खालीलप्रमाणे कळविण्याचे मला आदेश आहेत :-

सदर भूखंडावरील आरक्षण रद्द करणेबाबतचे अर्जदार यांचे विनंतीचे अनुषंगाने महापालिकेने गुणवत्तेनुसार सदर जागेवर विकास योजना-२०३४ मध्ये दर्शविण्यात आलेले 'उद्यान/बगीचा (ROS1.5 )' चे आरक्षण रद्द करण्याबाबत मंजूर विकास योजना-२०३४ मध्ये फेरबदल करण्यासाठी महापालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पूर्ण करून तसा प्रस्ताव शासनास सादर केल्यास त्यावर शासन स्तरावर गुणवत्तेनुसार निर्णय घेण्यात येईल".

त्याअर्थी, प्रशासक (सुधार समिति) यांचा ठराव क्र.१०१, दि.१२.१२.२०२५ व प्रशासक (महानगरपालिका) यांचा ठराव क्र.९८२, दि.१२.१२.२०२५ अन्वये 'के/पूर्व' विभागातील न.भू.क्रं.२०३ गाव- मजास ह्या भूखंडावरील 'बगीचा / उद्यान (ROS 1.5)' हे आरक्षण रद्द करून सदर भूखंड निवासी क्षेत्रामध्ये समाविष्ट करणेकामी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ कलम ३७(१) मधील तरतुदीनुसार मंजुर विकास आराखडा, २०३४ मध्ये फेरबदल करण्याच्या प्रस्तावाची कार्यवाही सुरु करणे, विहीत कालावधीमध्ये सूचना / हरकती मागविणे व प्राप्त सूचना / हरकतींवर सुनावणी देणे आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७(२) नुसार फेरबदल प्रस्तावास महाराष्ट्र शासनाची अंतिम मंजूरी घेणेकरिता नगरविकास विभाग खात्याशी संपर्क साधण्याची मंजूरी दिली आहे.

ज्याअर्थी, या प्रस्तावास प्रशासक (सुधार समिति) यांचा ठराव क्र.१०१ दि.१२.१२.२०२५ अन्वये मंजूरी दिल्यानंतर सदर प्रस्तावास महानगरपालिकेला मंजूरी करीता शिफारस करण्यात आली. सदर प्रस्ताव प्रशासक (महानगरपालिका) ठराव क्र.९८२ दि.१३.१२.२०२५ च्या अन्वये मंजूर केला. प्रशासक (महानगरपालिका) यांनी सदर ठराव मंजूर/पारित करते वेळी सोबतच्या नकाशा क्र. प्र.अभि./विनि./२३०४८/प.उ. दि.०९.१२.२०२५ मध्ये तुटक निळ्या रेषेने सीमांकित करून A-B-C-D-E-A ह्या इंग्रजी आद्याक्षरांनी दर्शविल्यानुसार 'के/ पूर्व' विभागातील न.भू.क्र.२०३, गाव मजास ह्या भूखंडावरील 'बगीचा / उद्यान (ROS 1.5)' हे आरक्षण अंदाजे क्षेत्रफळः९७५.७६ चौ.मी. रद्द करून सदर भूखंड निवासी क्षेत्रामध्ये समाविष्ट करून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७(१) अन्वये 'के/ पूर्व' विभागाच्या मंजूर विकास आराखडाः २०३४ मध्ये फेरबदल करण्याच्या प्रस्तावाची कार्यवाही सुरू करणे प्रस्तावित आहे.

याबाबत, विकास योजनेमध्ये फेरबदल करण्यासाठी, बृहन्मुंबई महानगरपालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१) अन्वये फेरबदलाची वैधानिक कार्यवाही करून फेरबदलाचा प्रस्ताव शासनास अंतिम मंजूरीसाठी सादर करावा असे प्रस्तावित आहे.

आणि त्याअर्थी, उपरोक्त परिस्थिती आणि वस्तुस्थिती विचारात घेता आणि उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१) अन्वये प्राप्त अधिकार आणि त्या संदर्भातील सर्व अधिकारांचा वापर करुन, बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे प्रस्तावित फेरबदलाविषयी उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१) नुसार कोणत्याही व्यक्तीकडून हरकती / सूचना मागविण्यासाठी तसेच संभाव्य बाधित होणाऱ्या व्यक्तींच्या माहितीसाठी सदर सूचना प्रसिध्द करीत आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून असेही कळविण्यात येत आहे की, वरील प्रस्तावित फेरबदलाविषयी कोणत्याही हरकती/सूचना,सदर सूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत लेखी स्वरुपात,

प्रमुख अभियंता (विकास नियोजन),
५ वा मजला, बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय,
विस्तारित इमारत, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१

या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठविण्यात याव्यात. सदरच्या कालावधीत प्राप्त होणा-या हरकती/सूचना यावर उक्त अधिनियमाच्या कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करण्यात येईल. त्यानंतर प्राप्त झालेल्या सूचना / हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

प्रस्तावित फेरबदल दर्शविणारा नकाशा जनतेच्या अवलोकनासाठी खालील कार्यालयात उपलब्ध करण्यात आला आहे. :

(१) प्रमुख अभियंता (विकास नियोजन), बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे कार्यालय, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.

(२) सहाय्यक आयुक्त (के/ पूर्व) विभाग कार्यालय, गुंदवली, आझाद रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०६९.

(३) उपसंचालक, नगररचना, बृहन्मुंबई यांचे कार्यालय, इन्साहटमेंट, ई-ब्लॉक, आझाद मैदान, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१.

दिनांक १३ डिसेंबर २०२५.
PRO/2657/ADV/2025-26.

**सु. हि. राठोड,**
प्रमुख अभियंता,
(विकास नियोजन).

## BRIHANMUMBAI MUNICIPAL CORPORATION

### Notice

No. Ch.E/DP/23048/WS.—Whereas, the Brihanmumbai Municipal Corporation is the Planning Authority for the area within its jurisdiction (hereinafter referred to as “the said Corporation”) as per the provision of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as ‘MR & TP Act, 1966) ;

Whereas, in exercise of the powers conferred by sub-section (*l*) of Section 3l of the said Act, the State Government *vide* Notification No. TPB-4317/629/CR-118/2017 /DP/UD-11, Dt. 08/05/2018 (hereinafter referred to as “the said Notification”) has accorded sanction to the Draft Development Plan-2034 of Greater Mumbai (hereinafter referred to as “the said Development Plan”) along with the Development Control and Promotion Regulations-2034 (hereinafter referred to as “the said Regulations”) for Greater Mumbai with modifications shown in SCHEDULE-A appended to the said Notification excluding the substantial modifications as shown in SCHEDULE-B appended to the said Notification; And whereas, Government has issued corrigendum of even number dt.22nd June, 2018; and whereas, thereafter Government has issued a corrigendum and Addendum of even number dt. 29th June, 2018 to the said Notification, which is published in *Government Gazette* dt. 30th June, 2018; and whereas, the said Regulations have come into force from l/09/2018;

And whereas, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) and (*2*) of Section 37 of the ‘MR & TP Act, 1966, the Planning Authority may, or when so directed by the State Government shall within Ninety days from date of such directions publish a notice inviting objections and suggestions from any person, as mentioned therein and after giving hearing, submit the proposed modification to the State Government and the State Government subject to such condition as it may deem fit sanction the modification or refuse to accord sanction;

And whereas, as per circular u/no. BMC/ADMN/3, dt. 07.04.2022, under section 6C (*1*) of Mumbai Municipal Corporation Act, 1888 (hereinafter referred as ‘MMC Act,1888’) all the powers of the Corporation are now vested with the Administrator;

And whereas, with respect to this office remarks dtd: 22.07.2021 & 16.09.2024 to Under Secretary, UDD in GoM. Under Secretary, UDD *vide* letter dtd. 16.09.2024 has directed as follows:

“ सदर भूखंड विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ चे विनियम १७ (१) मधील तरतुदीनुसार समावेशक आरक्षणाचे माध्यमातून विकसित करावयाचा झाल्यास त्यानुसार,महापालिकेस हस्तांतरीत करावयाचे भूखंडाचे क्षेत्र वगळता जमिन मालक यांना विकासासाठी राहणारे क्षेत्र कमी भरत असल्याची बाब विचारात घेता, आपणांस खालीलप्रमाणे कळविण्याचे मला आदेश आहेत :-

सदर भूखंडावरील आरक्षण रद्द करणेबातचे अर्जदार यांचे विनंतीचे अनुषंगाने महापालिकेने गुणवत्तेनुसार सदर जागेवर विकास योजना-२०३४ मध्ये दर्शविण्यात आलेले ‘उद्यान/बगीचा (ROS1.5 )’ चे आरक्षण रद्द करण्याबाबत मंजूर विकास योजना-२०३४ मध्ये फेरबदल करण्यासाठी महापालिकेने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पूर्ण करून तसा प्रस्ताव शासनास सादर केल्यास त्यावर शासन स्तरावर गुणवत्तेनुसार निर्णय घेण्यात येईल”.

And whereas, Administrator (Improvement Committee) & Administrator (Corporation) has accorded sanction *vide* resolution u/no.101 Dtd.12.12.2025 & u/no.982 dtd:12.12.2025 respectively to process the proposal and for inviting suggestions/ objections under section 37(*1*) of MR & TP Act & to make correspondence with the UD Department, Government of Maharashtra for final sanction u/s 37 (*2*) of MR & TP Act regarding modification in respect of plot bearing CTS No.203 of Village : Majas in K/East ward in D. P. 2034 under section 37(1) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 by deleting the reservation of ROS 1.5 (Garden / Park) affecting on said land & including the said land in residential (R) zone as per direction of UDD, GoM to be reads with Plan u/n: *Ch.E/ D.P/23048/WS. Dtd. 09.12.2025.*

And whereas, Administrator (Improvement Committee) & Administrator (Corporation) has empowered the Municipal Commissioner of Brihanmumbai Municipal Corporation to take further action under section 37(*1*) of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 and also

empowered to approach UDD, GoM for seeking the final sanction of State Government u/s 37(*2*) of Maharashtra Regional & Town Planning Act 1966 for proposed modification in Sanctioned Development Plan 2034 of 'K/East' Ward.

Now, therefore, after considering the above facts and circumstances and in exercise of the powers conferred by subsection (*1*) of Section 37 of the MR & TP Act, 1966; and of all other powers enabling it in this behalf, Brihanmumbai Municipal Corporation (hereinafter referred as BMC) hereby publishes a Notice for inviting objections/ suggestions from any persons with respect to proposed modification as required by Section 37(*1*) of the said Act, for information of all persons likely to be affected thereby. BMC is further pleased to inform that any suggestions and /or objections in respect of the proposed modification mentioned above may be forwarded, in writing before the expiry of one month from the date of publication of this notification to:

Office of Chief Engineer (Development Plan),

5th floor, Brihanmumbai Municipal Corporation,

Municipal Head office, Mahapalika Marg, Fort, Mumbai 1400 001.

Any suggestions and /or objections, which may be received within the said period will be dealt with in accordance with the provisions of Section 37(*1*) of the said Act by the Chief Engineer (Development Plan) BMC. The suggestions and /or objections received after the aforesaid period will not be considered.

A plan in respect of proposed modification to the Sanctioned Development Plan 2034 of K/E Ward is kept open for inspection of the general public during office hours except Saturday, Sunday and Public holidays, at the following offices:-

1) Office of the Chief Engineer (Development Plan), 5th Floor, Brihanmumbai Municipal Corporation, Mahapalika Marg, Mumbai 400 001.

2) Office of Asst.Commissioner (K/East) Ward, Gundavali, Azad Road, Andheri (E) Mumbai 400 069

3) Office of the Deputy Director of Town Planning, Greater Mumbai, having his office at ENSA Hutments, E-Block, Azad Maidan, Mahapalika Marg, Mumbai 400 001.

S. H. RATHOD,
Chief Engineer,
(Development Plan).

Dated 13th December 2025,
PRO/2657/ADV/2025-26.

**BAR COUNCIL OF MAHARASHTRA AND GOA**

No. BC/Gen/Admn/19095/2025

Stalwarts of Legal Profession Felicitated as a "Senior Lawyers Award" by Bar Council of Maharashtra and Goa Time to Time and we are given Special Black Coat in Honour of Felicitation at Nashik.

1. Adv. Indrayani Rajan Patni
2. Adv. Vasudha Dhondiram Karad
3. Adv. Shashikumar Ganesh Talekar
4. Adv. Suhas Jagannath Misar
5. Adv. Nivrutti Gopal Gaikwad
6. Adv. Kashinath Karbhari Ghuge
7. Adv. Vilas Murlidhar Lonari
8. Adv. Laxman Kisan Nikam ™
9. Adv. Madhukar Yashwant Kale
10. Adv. Bhagirath Nivrutti Shinde
11. Adv. Satish Ramchandra Mujumdar
12. Adv. Bhaskarrao Aanandrao Pawar
13. Adv. Santosh Eknath Gatkal
14. Adv. Nivrutti Kachru Kokate
15. Adv. Panditrao Motiram Bhadane
16. Adv. Babasaheb Dinkarrao Deshmukh
17. Adv. Nandkishor Gangabhisan Bhutada
18. Adv. Dilip Ramchandra Shinde
19. Adv. Shrikant Chintamani Abayankar
20. Adv. Satish Bhalchandra Kachole
21. Adv. Shankarrao Gangaram Sonawane
22. Adv. Govindrao Damodar Sawant
23. Adv. Dinkarrao Narhari Thakare
24. Adv. Chandrakant Dattatraya Kulkarni
25. Adv. Sharad Damodar Tambat
26. Adv. Murlidhar Gopalrao Gite
27. Adv. Jugalkishor Eknath Kalantri
28. Adv. Annasaheb Kachru Bhosale
29. Adv. Indrabhan Ramchandra Rayate
30. Adv. Vijay Narayan Junnare
31. Adv. Vishnupant Murlidhar Kasar
32. Adv. Dilip Shashikant Vanarse
33. Adv. Faruq Ajij Shaikh

34. Adv. Shekhar Bhaskar Raswalkar
35. Adv. Shridhar Pandurang Mane
36. Adv. Bhaskarrao Khnderao Chaure
37. Adv. Omprakash Ganeshdas Loya
38. Adv. Atik Iqbal Wasif
39. Adv. Ramesh Tukaram Jagtap
40. Adv. Ajit Kantilal Challani
41. Adv. Bipin Mohanlal Shingada
42. Adv. Mohd Tayyab Qasim Sayyad
43. Adv. Saurabh Narayanrao Baste
44. Adv. Avinash Janardan Bhide
45. Adv. Jayant Dattatrya Jaibhave
46. Adv. Nitin Baburao Thakare
47. Adv. Balasaheb Narayanrao Waje
48. Adv. Ramesh Badrinarayan Malpani

Mumbai,
dated 17th December 2025.

SHARAD T. BAGUL,
Secretary,
Bar Council of Maharashtra and Goa.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.